## रे. दिवाणी मुकदमा नं. ६५१/२००८ मधील नि. १३७ वरील आदेश

## (नारायण कृष्णा पोळ वि. निवृत्ती दादू पवार )

## (CNR:MHSN12000022–2007)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ९ चे वारस वारसांना रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्जदाखल केला आहे.

२. **वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

प्रस्तुत दाव्यामधील प्रतिवादी क्र. ९ नानासो रामचंद्र पवार हे दिनांक २३/११/२०१९ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी नं. ९ यांचे वारस रेकॉर्डवर आणणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी नं. ९ यांना खालीलप्रमाणे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ९ नानासो रामचंद्र पवार – मयत वारस –

| अ.नं. | नाव, वय, व्यवसाय व पत्ता | मयताशी नाते |
|---|---|---|
| ९/१) | श्रीमती छबुताई नानासो पवार<br>वय वर्षे- ७० धंदा - शेती,<br>रा. अहिल्यानगर, कुंडल, ता. पलुस, जि. सांगली | पत्नी |
| ९/२) | अरविंद नानासो पवार<br>वय वर्षे- ४५, धंदा - शेती,<br>रा. अहिल्यानगर, कुंडल, ता. पलुस, जि. सांगली | मुलगा |
| ९/३) | उज्वला शिवाजी पाटील<br>वय वर्षे- ४०, धंदा - शेती,<br>रा. द्वारा शिवाजी दादा पाटील,ओझर्डे, ता. वाळवा, जि. सांगली | मुलगी |
| ९/४) | शोभा तानाजी नलवडे<br>वय वर्षे- ३८, धंदा - शेती,<br>रा. द्वारा तानाजी ज्ञानू नलवडे, तुपारी फाटा, ता. पलुस, जि. सांगली | मुलगी |
| ९/५) | संतोष नानासो पवार,<br>वय वर्षे- ३५, धंदा - शेती,<br>रा. अहिल्यानगर, कुंडल, ता. पलुस, जि. सांगली | मुलगा |

३. सबब वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ९ यांना वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. प्रस्तुत प्रतिवादी नं. ९ यांचे वारस दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. सबब सदर वारस रेकॉर्डवर घेवून त्याप्रमाणे नि. १ कडील दावेमध्ये दुरुस्ती करणेस मे. कोर्टाची परवानगी असावी

अशी यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दाखल केले नाही. सबब त्यांच्याविरुध्द विना म्हणणे अर्ज चालविणेत आला.

५. वादी यांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादी यांनी वरील प्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे. दाव्यामध्ये अशा प्रकारे दुरुस्ती मंजूर केली असता त्यामुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती केल्यामुळे मुळ दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती जर नामंजूर केली तर वादी यांचे कधीही पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरची दुरुस्ती जर मंजूर केली तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा नि.१३७ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत नि. १३७ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दावा दुरुस्ती करुन सदरची दावा दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादींसाठी पुढील तारखेस हजर करावी.

IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2024.07.18 10:55:24 +0530

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–१६/०७/२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. Jyoti A. Salunkhe<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 16/07/2024 |
| Signed by P. O. on | : | 16/07/2024 |
| Uploaded on | : | 18/07/2024 |